प्रसिध्दी पत्रक दिनांक : २४/०४/२०२४

## खरेदी केलेली मोकळी जागा ग्रामपंचायतीच्या नमुन नं ०८ अ रजिस्टरवर नोंद करण्यासाठी पाच हजारांची लाच स्विकारणारे लोकसेवक प्रेमसिंग आडे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड यांचे जाळ्यात

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड युनिट |
| गुन्हा दाखल पोलीस ठाणे | पो.स्टे.किनवट गुरनं १०४/२०२४ कलम ७ अ भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ |
| गुन्हा दाखल तारीख व वेळ | दिनांक २४/०४/२०२४ रोजी ०२.१४ वा. स्टे.डा.नं ०३ वर |
| आरोपी लोकसेवक यांचे नाव, हुद्दा व पत्ता | प्रेमसिंग मोतीराम आडे वय ५२ वर्षे, व्यवसाय नोकरी पद ग्रामविकास अधिकारी, नेमणुक ग्रामपंचायत कार्यालय, मांडवी अतिरीक्त कार्यभार ग्रामपंचायत कार्यालय चिखली खु.ता. किनवट जि.नांदेड रा. गोकुंदा ता.किनवट जि. नांदेड |
| लाच स्विकारली रक्कम | ५,००० /- रूपये |

**थोडक्यात माहिती**

यातील तक्रारदार यांनी मौ. चिखली, ता.किनवट, जि.नांदेड येथील शेत सर्वे नं. ११८/२ मधील खरेदी केलेली मोकळी जागा (प्लॉट) ग्रामपंचायत चिखली येथील ८ अ रजिस्टरवर नोंद करण्यासाठी ग्रामसेवक प्रेमसिंग आडे, ग्रामपंचायत मांडवी अतिरिक्त पदभार ग्रामपंचायत चिखली यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदाराचे सदरचे शासकीय कामासाठी तक्रारदार यांना रूपये ५,०००/- ची मागणी केली.

सदरची रक्कम रुपये ५,०००/- ही लाच असल्याचे तक्रारदार यांना खात्री झाल्याने व त्यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड येथे तक्रार दिली.

आज दि. २३/०४/२०२४ रोजी आरोपी लोकसेवक ग्रामसेवक आडे यांनी तक्रारदार यांना शासकीय पंचासमक्ष रूपये ५,०००/- लाचेची मागणी केली.

त्यानंतर पंचासमक्ष लाचेची रक्कम रूपये ५,०००/- स्वत:चे राहते घरी गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड येथे स्वीकारताना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नांदेड च्या पथकाने त्यांना रंगेहात पकडले आहे.

नमुद प्रकरणात आरोपी लोकसेवक प्रेमसिंग मोतीराम आडे यांना ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन किनवट ता. जि. नांदेड येथे गुन्हा दाखल करण्यात आला.

| | |
|---|---|
| सापळा पथक | सदरची कार्यवाही ला.प्र.वि. नांदेड परिक्षेत्र, नांदेड चे पोलीस अधीक्षक डॉ.राजकुमार शिंदे, यांचे मार्गदर्शनाखाली, पर्यवेक्षण अधिकारी पोलीस उप अधीक्षक राजेंद्र पाटील, तसेच सापळा कार्यवाही पथक पोलीस निरीक्षक अरविंद हिंगोले, पोहेकॉ/सुर्यकांत वडजे, पोना/राजेश राठोड, पोकॉ/विनयकुमार नुकलवार, पोकॉ/सय्यद खदीर, चापोना/मरोती सोनटक्के सर्व लाप्रवि नांदेड युनिट |
| गुन्हयाचा तपास | पोलीस निरीक्षक अरविंद हिंगोले, पोलीस निरीक्षक, अँटी करप्शन ब्युरो, नांदेड |

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाशी संपर्क साधावा.

| संपर्क पत्ता :- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड, नागार्जुनसागर बिल्डील स्नेहनगर/श्रीनगर नांदेड | |
|---|---|
| संपर्क कमांक :- 02462-253512<br>टोल फ्री कमांक- 1064 | ऑनलाईन तकार ॲप्लीकेशन acbmaharashtra.net |
| मा. पोलीस अधीक्षक 9623999944 | पोलीस उपअधीक्षक 7350197197 |
| ई-मेल आयडी<br>spacbnanded@mahapolice.gov.in | ई-मेल आयडी<br>dyspacbnanded@mahapolice.gov.in |
| FACEBOOK – Dysp Acb Nanded | TWITTER - @ACBnanded |
| INSTAGRAM – acb_nanded | |

पोलीस उपअधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड

Scanned with CamScanner